महाराष्ट्र शासन

मराठी भाषा विभाग मंत्रालय, मुंबई

दिनांक १४ जानेवारी ते २८ जानेवारी

# मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त

मराठी भाषा विभागातर्फे मंत्रालयातील अधिकारी, कर्मचारी यांच्याकरीता अभिवाचन आणि काव्यवाचन स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे.

## - अभिवाचन स्पर्धा -

**विषय - स्वातंत्र्याचे अमृतमहोत्सवी वर्ष : स्वातंत्र्यपूर्व/स्वातंत्र्योत्तर भारत**

## - काव्यवाचन स्पर्धा विषय -

**ज्येष्ठ कवयित्री शांता शेळके आणि कवी वसंत बापट यांच्या कविता**

- प्राथमिक फेरी : दिनांक-१४.१.२०२२
- अंतिम फेरी : दिनांक-१९.१.२०२२

नोंदणीची अंतिम तारीख ७ जानेवारी, २०२२

इच्छुकांनी आपली नावे aarti.sane@nic.in या ई-मेलवर दि. ७.१.२०२२ पर्यंत द्यावीत.

महाराष्ट्र शासन

मराठी भाषा विभाग — मंत्रालय, मुंबई

# मराठी भाषा संवर्धन पंधरवडा

## दिनांक १४ जानेवारी ते २८ जानेवारी

मराठी भाषेच्या संवर्धनासाठी, विकासासाठी, प्रचार व प्रसारासाठी वेगवेगळे उपक्रम राबविणाऱ्या मंत्रालयातील अधिकारी/कर्मचाऱ्यांचा मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याच्या निमित्ताने सन्मान करण्याची योजना आहे. यासाठी खालील निकष पूर्ण करणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांनी आपली माहिती थोडक्यात नमूद करुन rajashri.bapat@nic.in या ई-मेलवर दिनांक ५ जानेवारी २०२२ पर्यंत पाठवावी.

## निकष

१) मराठी भाषेत कादंबरी/कथा/कविता/लेख इत्यादी लेखन लोकराज्य/आपले मंत्रालय या सारखी मासिके/पाक्षिके, दिवाळी अंक, समाज माध्यमे (ट्वीटर, फेसबुक इ.) यावर सातत्याने प्रसिध्द झालेले असावे.

२) विविध माध्यमातून मराठी भाषेचा प्रचार- प्रसार करणारे कार्यक्रम, उपक्रम, स्पर्धा, अभिवाचन, वाचनकट्टा यांचे आयोजन दिर्घकाळ सुरु असल्यास सदर उपक्रम कधीपासून राबविण्यात येत आहेत, त्याची संकल्पना काय आहे या बाबतची माहिती.

**वरीलप्रमाणे प्राप्त होणाऱ्या अर्जांपैकी १० व्यक्तींची निवड करुन त्यांचा मा.मंत्री (मराठी भाषा) यांच्या हस्ते दि.१८.०१.२०२२ ते २०.०१.२०२२ या कालावधीत सत्कार करण्यात येईल.**